# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.11.2025** **वारःमंगळवार**

1.समाजातील वंचित घटक आणि युवा पिढीच्या सक्षमीकरणासाठी नागरी सहकारी बँकांनी पुढाकार घ्यावा - केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचं आवाहन

2.राज्यातल्या ज्योतिर्लिंग क्षेत्रांचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

3.आदिवासी कार्य मंत्रालयाच्या आदि चित्र प्रदर्शनाचं मुंबईत उद्‌घाटन

आणि

4.दिल्लीत कारमध्ये झालेल्या स्फोटात आठ जणांचा मृत्यू

**<u>अमितशहा</u>**

समाजातील वंचित घटक आणि युवा पिढीच्या सक्षमीकरणासाठी नागरी सहकारी बँकांनी पुढाकार घ्यावा असं आवाहन केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं आहे. सहकार कुंभ २०२५ या नागरी सहकारी बँकांबाबतच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्‌घाटन काल नवी दिल्लीत शहा यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्राथमिक कृषी पतसंस्थांसाठी केंद्र सरकारनं आदर्श नियमावली तयार केली आहे. देशातल्या सर्व कृषी पतसंस्था या नियमावलीनुसार काम करत आहेत आणि यामुळे

या पतसंस्था बंद पडण्याचं प्रमाण लक्षणीयरित्या कमी झालं आहे असं शहा म्हणाले.

राष्ट्रीय नागरी सहकारी बँक आणि पतसंस्था महामंडळ आणि सहकार मंत्रालयानं; संवाद, नवकल्पना आणि विचारांच्या आदानप्रदानातून देशातील सहकार क्षेत्राचा पाया मजबूत करण्याच्या उद्देशानं ही दोन दिवसांची परिषद आयोजित केली आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

भीमाशंकर, औंढा नागनाथ आणि घृष्णेश्वर, या राज्यातल्या ज्योतिर्लिंग क्षेत्रांचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. मंदिर परिसरात सुरू असलेली कामं वेगानं पूर्ण करा, प्रस्तावित कामांचं योग्य नियोजन करा असं मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातल्या बैठकीत काल सांगितलं. भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करा आणि भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीनं कार्यवाही करा अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<u>आदिचित्र</u>**

भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारच्या आदिवासी कार्य मंत्रालय आणि ट्रायफेड यांच्यातर्फे आयोजित आदि चित्र या प्रदर्शनाचं उद्घाटन काल मुंबईत आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक वुईके यांच्या हस्ते झालं. या प्रदर्शनात देशभरातील १०० हून अधिक पारंपरिक आदिवासी चित्रांचा समावेश आहे. प्रभादेवी इथल्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत येत्या रविवारी १६ नोव्हेंबरपर्यंत नागरिकांना हे प्रदर्शन पाहता येईल.

दरम्यान, मुंबई विद्यापीठातल्या आदिवासी अध्ययन आणि संशोधन उत्कृष्टता केंद्राचं उद्घाटन काल वुईके यांच्या हस्ते झालं. यावेळी ‘आदिवासी अस्मिता’ आणि त्यांचं ‘सांस्कृतिक महत्त्व’ या विषयीच्या चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. निसर्गपूजक आदिवासी समाजानं आपल्या श्रद्धा, संस्कृती आणि जीवनमूल्यांच्या माध्यमातून पर्यावरणाशी सुसंवाद साधत जीवन जगण्याची अद्वितीय परंपरा निर्माण केली आहे. या परंपरेच्या संवर्धन आणि प्रसारासाठी, शास्त्रशुद्ध संशोधनाची आवश्यकता असल्याचं वुईके यावेळी म्हणाले.

**<u>दिल्लीस्फोट</u>**

राजधानी दिल्लीमध्ये लाल किल्ल्याजवळ काल संध्याकाळी झालेल्या स्फोटात 8 जण ठार आणि काही जण जखमी झाले असल्याचं, केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी काल घटनास्थळी भेट दिल्यानंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं. यासंदर्भात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत बोललो असून सर्व तपास पथकं या घटनेचा उलगडा करण्यात गुंतली असल्याचं ते म्हणाले. सखोल तपासामध्ये या घटनेचे सर्व धागेदोरे शोधले जातील आणि त्याचे निष्कर्ष सर्वांसमोर ठेवले जातील असंही शहा म्हणाले दरम्यान, दिल्ली बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभुमीवर, राज्यातल्या सर्व तपास यंत्रणांना सतर्क राहाण्याचे निर्देश पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचं महाराष्ट्राच्या गृह विभागाच्या सुत्रांनी म्हटलं आहे. .

**<u>खड्डे</u>**

नागरिकांनी खड्डे किंवा असुरक्षित रस्त्यांबाबत तत्काळ संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार करावी, असं आवाहन पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी केलं आहे. तसंच रस्त्यांवरील खड्ड्यांमुळं मृत्यू किंवा जखमी झालेल्या पीडितांच्या कुटुंबियांना मदतीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीनं संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश डी. पाटील यांच्या खंडपीठानं, खड्डयांमुळं होणारे मृत्यू आणि रस्त्यांवरील सुरक्षितता याबाबत गेल्या १३ ऑक्टोबरला महत्वपूर्ण निकाल दिला आहे. भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत रस्ते सुरक्षित स्थितीत ठेवणं हे नागरी आणि रस्ते निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांचं संवैधानिक कर्तव्य आहे.

**<u>सूचना</u>**

पुणे जिल्ह्यातील १४ नगरपरिषद आणि ३ नगरपंचायतीच्या सदस्य आणि अध्यक्षपदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. निवडणुकीच्या कालावधीत काय करावं आणि काय करु नये याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काल प्रकाशित केल्या आहेत.

**<u>बावनकुळे</u>**

राज्यात महायुतीबाबतची चाचपणी अंतिम टप्प्यात असून महायुतीचाच मार्ग योग्य आहे. मात्र महायुती शक्य नसलेल्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत घेताना मतभेद आणि मनभेद होणार नाहीत याची खबरदारी घेण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना दिल्या आहेत असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल सांगितलं. ते नागपूरमध्ये

पत्रकारांशी बोलत होते. तिकीट वाटप आणि स्थानिक निर्णयांचे सर्वाधिकार जिल्हाध्यक्ष आणि कोर कमिटीला देण्यात आले आहेत. १७ नोव्हेंबरपर्यंत महायुतीचीबाबतचं संपूर्ण चित्र स्पष्ट होईल असं बावनकुळे म्हणाले.

**<u>मविआमनसेआघाडी</u>**

नाशिक जिल्ह्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र लढणार आहे. महाविकास आघाडी आणि मनसेच्या नाशिकमधल्या पदाधिकाऱ्यांच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**<u>विखेपाटील</u>**

कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील कुकडी कालव्याचा कामाचा प्रारंभ, काल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला. वर्षभरात ही सर्व कामं पूर्ण केली जातील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात सहा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>कुष्ठरोग</u>**

सातारा जिल्ह्यात येत्या १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या काळात कुष्ठरोग शोध मोहीम राबवण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सहकार्य करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे. या

मोहीमेअंतर्गत २ हजार ८६१ पथकांमार्फत ग्रामीण भागात संपूर्ण लोकसंख्येची तर शहरी भागात जोखमीच्या लोकसंख्येची तपासणी केली जाणार आहे.

**<u>आरोग्यशिबीर</u>**

बीड इथं आनंदऋषीजी रुग्णालयात उद्या मूत्रपिंड विकार तपासणी आणि मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आलं आहे. शिबिरात उपस्थित राहणाऱ्या रुग्णांना आवश्यक तपासणी कमी दरात उपलब्ध करून देण्यात येतील. तसंच गरजू रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत डायलिसिस सेवा दिली जाणार आहे.

**<u>विपश्यनाकेंद्र</u>**

विकसित भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी संस्कारक्षम पिढी तयार करणं आवश्यक आहे. विपश्यना केंद्राच्या माध्यमातून या कामाला गती मिळेल असा विश्वास अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. सृजनशील शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक सेवा मंडळातर्फे उभारण्यात येणाऱ्या बोधीभुमि संस्कार केंद्राच्या पायाभरणी सोहळ्यात ते काल बोलत होते.

**<u>जीएसटी</u>**

पुस्तक आणि कागदावर लागू असलेला वस्तू आणि सेवा कराचा दर कमी करण्याची मागणी प्रकाशन आणि शैक्षणिक क्षेत्राकडून करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर,

पुण्याचे खासदार तथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना याबाबत औपचारिक पत्र पाठवलं आहे.

कागद आणि संबंधित साहित्यावरील जीएसटी दर १२ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत वाढल्यामुळं पुस्तकांच्या किंमतींमध्ये १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. या वाढीचा परिणाम थेट विद्यार्थी, पालक, लेखक, तसंच लघु आणि मध्यम प्रकाशन उद्योगांवर होत आहे. कोविडनंतर अजूनही सावरण्याच्या टप्प्यात असलेला प्रकाशन व्यवसाय, या वाढलेल्या करामुळं पुन्हा संकटात सापडू शकतो, त्यामुळं या जीएसटी वाढीचा पुनर्विचार करावा अशी विनंती मोहोळ यांनी पत्रामध्ये केली आहे.

**पुरस्कार**

नांदेडमधल्या लेखिका आणि स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर वृषाली किन्हाळकर यांना यंदाचा शिरीष पै जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या मराठवाड्यातल्या पहिल्या लेखिका ठरल्या आहेत. मुंबईत येत्या शनिवारी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

**किरणोत्सव**

कोल्हापूर इथल्या अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळा काल पूर्ण झाला. मावळतीच्या सोनेरी सूर्यकिरणांनी देवीच्या मुखकमलाला स्पर्श केला. यानंतर देवीच्या आरतीनं किरणोत्सवाची सांगता झाली.

**<u>बिबट्याहल्ला</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कोपरगाव तालुक्यात बिबट्यानं केलेल्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला. अन्य एका ठिकाणी बिबट्यानं केलेल्या हल्ल्यात एक महिला जखमी झाली आहे.

**<u>वॉलीबॉल</u>**

पालघरच्या सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या विभाग क्रमांक दोनच्या आंतर महाविद्यालयीन विभागीय वॉलीबॉल स्पर्धांना दिमाखात सुरुवात झाली. या स्पर्धेमध्ये पुरुषांचे 57 आणि महिलांचे 31 संघ सहभाग झाले आहेत.

**<u>आयर्नमॅन</u>**

गोव्यात रविवारी झालेल्या गोवा आयर्नमॅन ही दमश्वासाची परीक्षा घेणारी स्पर्धा दिलेल्या वेळेत पूर्ण करून सिंधुदुर्ग जिल्हयात कुडाळच्या प्रमोद भोगटे यांनी ४५ ते ४९ या वयोगटात  उल्लेखनीय यश मिळवलं आहे. देशविदेशातून सुमारे पंधराशे स्पर्धक सहभागी झालेल्या या स्पर्धेत सुमारे दोन किलोमीटर पोहणे, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१ किलोमीटर धावणे अशी सुमारे ११३ किलोमीटरची स्पर्धा प्रमोद भोगटे यांनी दिलेल्या वेळेत पूर्ण केली. साडे आठ तासात हे अंतर पूर्ण करायचं असतं, प्रमोद यांना हे अंतर पूर्ण करण्यासाठी ८ तास २५ मिनिटं लागली. अशा प्रकारची स्पर्धा पूर्ण करणारे प्रमोद भोगटे हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातले पहिले स्पर्धक ठरले आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**